फ्लॅशबॅक


# पापाजी का जवाब नहीं! पृथ्वीराज कपूर

**राज कपूर हे एकमेवाद्वितीय शोमन इंडस्ट्रीत मानले जातात पण त्यांचे वडील पृथ्वीराज कपूरच खरे शोमन म्हणावे लागतील. पेशावरहून कामाच्या शोधात ते मुंबईला आले तेव्हा ते नाटकात कामं करायचे. चित्रपटात रोज दिड रूपयाच्या हिशोबाने ज्युनियर कलाकार म्हणून ते इंडस्ट्रीत आले आणि बघता बघता ते स्टार झाले.**

शकील अहमद

महिन्याला वीस दिवस काम केले की पृथ्वीराज कपूर यांची दिवसाची सरासरी मिळकत एक रूपया असे. त्या मिळकतीत दैनंदिन खर्चाची विभागणी अशा प्रकाराने व्हायची, एका आण्याची बैदा रोटी, एका आण्याचे बदकाचे अंडे, एका आण्याचे दूध, एका आण्याच्या अर्धा किलो भाज्या, एका आण्याची फळे, एक आणा धोब्याला व एक आणा माटुंग्याहून स्टुडियोत येण्याजाण्याचा वाहन खर्च. रोज आठ आणे खर्चले जात उरलेल्या आठ आण्याची बचत.

रणजित मुव्हीटोनच्या एका चित्रपटात ते ज्युनियर कलाकार होते. मास्टर विठ्ठल त्यात हीरो होते. काही कारणाने मास्टर विठ्ठल पहिल्यादिवशी हजर राहू शकले नाही तेव्हा निर्मातै-दिग्दर्शकांचा पारा उसळला. दुसऱ्या कुणाला आणून उभे करा, दिग्दर्शकाचा आदेश सुटताच फायटर डब्ल्यू. एम. खान यांना बोलावले गेले. पण ते एकदम शेलाट्या बांध्याचे. हीरो म्हणून चालणारे नव्हते. त्यामुळे हीरोचा शोध सुरू झाला. नायिका मात्र नेहमी पृथ्वीराज कपूर यांना त्यांच्या धष्टपुष्ट बांध्यामुळे सतत बघत असायची. शेवटी तिनेच निर्मात्या-दिग्दर्शकांपुढे प्रस्ताव ठेवला आणि पृथ्वीराज कपूर यांच्याकडे अंगुलीनिर्देश करत 'ये लडका कैसा रहेगा?' म्हणून विचारले. धष्टपुष्ट बांध्याच्या पृथ्वीराज यांना हीरोसाठी शिवलेले पोशाख येईनात. मग ताबडतोब






**अभिनेते पुत्र शशी, राज व शम्मीसह 'पापाजी' पृथ्वीराज**

काम करणारे कित्येक कामगार बेकार झाले. ते पापाजींवर टीका करत. दर महिन्याला पगार मिळत होता आता तुमच्यामुळे आम्ही बेकार झालो.

पापाजींनी एकावेळेला दोन चित्रपट स्वीकारले. दोन्ही चित्रपट एकाचवेळी सेटवर होते. एक होता *रामराज्य* नि दुसरा होता *सीताहरण*. *रामराज्य*मध्ये पृथ्वीराज राम बनलेले तर *सीताहरण*मध्ये रावण. दोन परस्पर टोकाच्या भूमिका. हे दोन्ही चित्रपट एकाच स्टुडियोत चित्रीत होत होते. पण रामाच्या नम्रतेनंतर रावणाच्या कर्मटतेत शिरताना पापाजींची कधी त्रेसेहोलपट झाली नाही. ते शांतपणे दोन्ही भूमिका व्यवस्थित रंगवत होते. या दोन्ही भूमिका खूप गाजल्या. इथे त्यांची आरशापुढे समाधी लावून पात्र आत्मसात करून घेण्याची हातोटी अधिक कामी आली. मेकअपरूममधून बाहेर पडल्यावर त्यांची चालच सांगायची की राम आहेत की रावण.

पापाजींचा स्वाभीमान जबरदस्त होता. त्यांची आर्थिक स्थिती दुर्धर होत गेली तेव्हा नाट्यसंस्था 'पृथ्वी थिएटर' ही बंद पडले. पाच लाखाच्या (त्या काळात) कर्जाचा डोंगर डोक्यावर तयार झाला. तेव्हा मुलगा राज कपूर सिनेसृष्टीत नाव कमवू लागला होता. खोऱ्याने पैसा ओढू लागला होता. पण स्वाभीमानी पित्याने मुलापुढे हात पसरला नाही. राज



**नातवंडांसह 'ग्रॅण्ड पापाजी'**

कपूरनी वयाच्या अठराव्या वर्षी पहिला चित्रपट *आग*ची निर्मिती केली व दिग्दर्शनही केले. तेव्हा संपूर्ण युनिट पृथ्वी थिएटरमधूनच त्यांनी घेतले. हसरत व शैलेंद्र आधी पृथ्वी थिएटरमध्ये ढोलक वाजवायचे. *बरसात*च्या चित्रीकरणाच्यावेळी पापाजींची प्रकृती ठीक नसायची. परंतु पावसात गुडघाभर पाण्यात उभे राहून ते चित्रीकरण बघत राह्यचे. तरी मुलाकडे त्या कामाचे पैसे त्यांनी मागितले नाही. राज कपूरदेखील पित्यासारखा स्वाभीमानी असल्याने वडलांच्या लोकप्रियतेचा फायदा मिळवून इंडस्ट्रीत न राहता स्वतःच्या कुवतीवर स्वतःचे स्थान त्यांनी निर्माण केले.

शेवटची सात-आठ वर्षे पृथ्वीराज कपूर यांची वाचा गेली. *तीन बहुरानियां* त्यांनी पंचवीस हजारात करारबद्ध केलेला. तेव्हा ते मोठे स्टार होते. पण डबिंगच्यावेळी त्यांचा आवाजच फुटेना. निर्मात्यांनी डबिंगचे काम दुसऱ्या कलाकाराकडून करून घेतले. तेव्हा निर्मात्याने डबिंग कलाकाराचे मानधन तुमच्या पंचवीस हजाराहून कापून घ्यावे लागतील असे पापाजींना सांगितले. पापाजी तसे हजरजबाबी. त्यांनी निर्मात्याला सांगितले की, तुम्ही कुणाकडूनही डबिंग करून घ्या. आज घडीला माझी प्राईस पाच लाख एवढी आहे. त्या पाच लाखातून पंचवीस हजार मला मिळालेत. डबिंग कलाकाराचे मानधन कापून घ्या नि उरलेले माझे पैसे मला चुकते करा. निर्मात्याची बोलती साफ बंद झाली होती.

सिनेमाच्या क्षेत्रात ज्याची त्याची एक ठराविक वेळ असते. एका वेळेला कलाकार शिखरावर असणारा कलाकार दुसऱ्या क्षणाला दरीत असतो. दरीत कोसळल्यावर पायांनी ठेचून त्याला आणखी दरीत कोसळवणारे या इंडस्ट्रीत कमी नाहीत. पण पापाजींनी सतत या लोकांपासून सावधगिरी बाळगली. इंडस्ट्रीच्या उदोउदोला ते कधी हुरळून गेले नाहीत की दडपशाहीला कधी भ्यायले नाहीत. म्हणूनच ते कायम पापाजी राह्यले. ●

मगनलाल ड्रेसवाल्यांना वर्दी दिली गेली आणि पृथ्वीराज कपूर हिंदीत हीरो झाले. हीरोबरोबरच मासिक पगार शंभर रूपये झाला. हा चित्रपट होता *मिस्टिरियस वूमन.*

*मुगल-ए-आझम*मध्ये पापाजींनी अकबर बादशाहची भूमिका अशा काही झोकात केली की, पुढे तसा अकबर बादशाह कुणी ठसवलाच नाही. आजही बादशाह अकबर म्हटले की, पापाजींची मूर्तीच डोळ्यापुढे येते. खरंतर पापाजींनी अकबर बादशाहची भूमिका एकदाच केली होती. मझहर खान नामक कलाकाराने पडद्यावर सव्वीस वेळा अकबर रंगवला, त्याशिवाय मुबारकही *बैजू बावरा, अनारकली* या चित्रपटांमध्ये सहा-सात वेळा अकबर बनलेला पण हे अकबर लोकांच्या मनावर तेवढे अधिराज्य गाजवू शकले नाही. पापाजींनी एका मुलाखतीत कबूल केले की, अकबराचे इतिहासात वर्णन आहे त्या वर्णनाशी माझी देहयष्टी मेळ धरणारी बिल्कूल नाही. अकबर उभट चेहऱ्याचा, पाच फूटाहून किंचित जास्त उंची आणि शेलाटी शरीरयष्टी. तर माझा चेहरा गोल, उंची सहा फूट आणि धष्टपुष्ट बांधा. माझे संपूर्ण शरीरमान वेगळे खरंतर मझहर खानच अकबराच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळतेजुळते व्यक्तिमत्त्व असलेला कलाकार आहे. पण लोक मी केलेला अकबर विसरायलाच तयार नाहीत.

*मुगल-ए-आझम*मध्ये अकबराच्या मिशाही तुर्की नव्हत्या की राजपूतांसारख्याही नव्हत्या. याचे कारण सांगताना पृथ्वीराज कपूर म्हणाले होते की,

"माझी एक सवय होती की, संपूर्ण मेकअप करून आरशासमोर मी पाच मिनिटे डोळे मिटून समाधी लावल्यागत बसायचो नि पात्र आत्मसात करायचो. मग डोळे उघडल्यावर मी स्वत:ला पृथ्वीराज कपूर म्हणून आरशात बघत नसे तर ते पात्र म्हणूनच बघत असे. मेकअपरूपममधून मग कॅमेऱ्यापुढे येताना माझ्या चालण्या-बोलण्यात त्या कलाकाराचेच चित्र दिसायचे.


*मुगल-ए-आझम*च्या चित्रीकरणाच्या पहिल्या दिवशी मी समाधी लावून आरशासमोर बसलो. मिशांवर हात फिरवून त्यांना पिळ भरला. जेव्हा पहिले दृश्य ओके झाले तेव्हा आसिफ साहेब म्हणाले की, पापाजी तुमच्या मिशांचे काय केलेत? तेव्हा मला प्रथमच गोंधळाची कल्पना आली. पण नंतर तेच म्हणाले की, यात तुम्ही खरे शहनशाह दिसता. मग त्या मिशा सर्वांना आवडल्या."

*मुगल-ए-आझम*च्या एका गाण्यासाठी के. आसिफ बडे गुलाम अली खां साहेब यांना करारबद्ध करायला नौशाद यांच्यासह ग्वाल्हेरला गेले. त्या काळात पाचशे रूपयात कुणीही गायक हसत हसत यायला तयार व्हायचा. पण गुलाम अली खां यांनी आसिफ यांना पळवून लावण्यासाठी पंधरा हजार रूपये मागितले. आसिफनी ताबडतोब त्या रकमेला होकार दिला आणि त्यामुळे गुलाम अली खां यांना नकार देण्यासाठी काही कारण उरले नाही. गुलाम अली खां मुंबईत रेकॉर्डिंगसाठी आले तेव्हा गुलाम अली खां साहेब रेकॉर्डिंग करताना खां साहेबांनी रागदारी अशी छेडली की, पाच तास अविरत ते गातच राहिले. त्यांना गाताना कुणीही अडवू शकले नाही. नौशादनी मात्र जेवढी गरज होती तेवढेच गाणे रेकॉर्ड केले. तेव्हा आसिफ यांनी आणखी १५ हजाराचा चेक फाडला. उस्ताद बडे गुलाम अली खांना नवल वाटले कारण त्यांनी मागितलेली रक्कम त्यांना आधीच मिळाली होती. तेव्हा आसिफ म्हणाले की, ती रक्कम तुम्ही यायला होकार दिलात त्याची होती. खरे मानधन आताचेच आहे.

चित्रपटात रीतसर करार करणाऱ्या कलाकारांमध्ये पहिले कलाकार पृथ्वीराज कपूरच होते. त्यांच्यापुढे मासिक पगारावर



◀ *सीताहरण*मध्ये रावणाच्या भूमिकेत पृथ्वीराज कपूर



पितापुत्र पृथ्वीराज -राज कपूर ▶